मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# "ॲल्युमिनिअम मॅन ऑफ इंडिया" उद्योजक भरत गीते यांना "महाराष्ट्र उद्योग भूषण" पुरस्कार!

## एक्सप्रेस मीडिया इंटरप्राईसचा पिंपरी-चिंचवडमध्ये दिमाखदार सोहळा, विविध क्षेत्रातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचा "फेस ऑफ इन्स्पिरेशन" ने सन्मान

**पिंपरी | प्रतिनिधी**

"महाराष्ट्र उद्योग भूषण पुरस्कार" हा केवळ वैयक्तिक सन्मान नसून संपूर्ण उद्योगविश्वासाठी प्रेरणादायी टप्पा आहे. उत्पादन, कौशल्य विकास आणि तंत्रज्ञानाच्या बळावर महाराष्ट्र $1 ट्रिलियन अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करत असून, या प्रवासात उद्योग क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे," असे प्रतिपादन "ॲल्युमिनिअम मॅन ऑफ इंडिया" म्हणून ओळखले जाणारे प्रसिद्ध उद्योजक भरत गीते यांनी केले.

पिंपरी-चिंचवडमध्ये उद्योग, समाजसेवा आणि प्रेरणादायी कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी एक्सप्रेस मीडिया इंटरप्राईसचा भव्य सोहळा आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात के. राहूल यांच्या गायनाने झाली, त्यानंतर गुरुवर्य ॲकॅडेमी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी गणेश वंदना सादर केली.

सोहळ्याचे औपचारिक उद्घाटन दीप प्रज्वलनाने करण्यात आले, त्यानंतर मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. उपस्थित मान्यवरांमध्ये जेष्ठ अभिनेते व नाम फाऊंडेशनचे संस्थापक मा. मकरंद अनासपुरे, संसदरत्न खासदार मा. श्रीरंग बारणे, महापौर रवी लांडगे, प्रमुख प्रायोजक कुमार लाईफस्पेसेसचे संचालक मा. अमेय जैन आणि उद्योगक्षेत्रातील मा. भरत गीते, महावितरण चे कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर, शिवसेनेचे मुख्य सचिव वैभव थोरात, राष्ट्रवादीच्या शहराध्यक्ष कविता अल्हाट, नगरसेविका सुलभा उबाळे, नगरसेवक अनंत कोऱ्हाळे यांचा समावेश होता. यावेळी उद्योजक भारत गीते यांची प्रकट मुलाखत घेण्यात आली. त्यांच्या मुलाखतीमध्ये उपस्थित विद्यार्थी, श्रोत्यांना प्रेरणा मिळाली.




### पुरस्कारार्थींची नावे पुढीलप्रमाणे

» भरतजी गीते (महाराष्ट्र उद्योग भूषण पुरस्कार), वैभव थोरात (शिक्षणमहर्षी), विठ्ठल हॉस्पिटल, मोशी (महाराष्ट्र धन्वंतरी गौरव पुरस्कार), रविंद्र दत्तात्रय ठिकेकर (यशस्वी उद्योजक पुरस्कार), संदीप बेलसरे (उद्योग नवोन्मेष पुरस्कार), सुनील काकडे (मुख्य अभियंता महावितरण) (कार्यगौरव पुरस्कार), नितीन सूर्यवंशी (कार्यगौरव पुरस्कार), दीपक अशोक माने (सामाजिक कार्यगौरव), डॉ. जयश्री सुरवसे (द्रोणाचार्य पुरस्कार), ज्योत्स्ना भूषण मावळे (मानसशक्ती पुरस्कार), नवनाथ ढवळे (शिक्षण रत्न पुरस्कार), वंदना चौव्हाण (नारीशक्ती कार्यगौरव), मराठवाडा युवा मंच (सामाजिक कार्यगौरव), समर्थ महिला बहुउद्देशीय (महिला सशक्तीकरण कार्यगौरव), नीता पाडाळे (आदर्श नगरसेविका), प्रिती बोंडे(उत्कृष्ट व्यक्तिमत्व), केसर ग्रुप (उत्कृष्ट बांधकाम व्यावसायिक), विश्वकल्याण इंग्लिश मिडीयम स्कूल (ज्ञानदीप गौरव पुरस्कार), जाणीव परिवार (मोशी) (सामाजिक कार्यगौरव), आपला परिवार सोशल फाउंडेशन (पर्यावरण संवर्धन कार्यगौरव), शिवयोद्धा ग्रुप (महाराष्ट्र शिवविचार गौरव).

सोहळ्यात उद्योगक्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल उद्योजक आणि "ॲल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया" म्हणून ओळखले जाणारे मा. भरत गीते यांना महाराष्ट्र उद्योग भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यानंतर उर्वरित विशेष पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

संचालिका मनीषा थोरात-पिसाळ यांनी आपल्या भाषणात संस्थेची ओळख, सामाजिक बांधिलकीसाठी पुरस्काराचे महत्त्व, कुटुंबाचा आधार आणि प्रेरणादायी संदेश यावर भर दिला. त्यांनी सांगितले की, दृढनिश्चय, प्रामाणिकपणा, मेहनत आणि समाजासाठी योगदान हेच खरे यश निर्माण करतात. तसेच उपस्थितांना संदेश दिला की, प्रत्येक अडचणीत धैर्याने सामना करावा आणि मेहनत व विश्वासाने स्वप्न पूर्ण करावेत.

सोहळ्यात रमा-मंगल फाउंडेशनचे संस्थापक संतोष सौंदणकर यांच्यासह अनेक मान्यवरांचे सहकार्य होते. कार्यक्रमाचे मुख्य प्रायोजक कुमार लाईफ स्पेसेस, विठ्ठल हॉस्पिटल मोशी, धनश्री हॉस्पिटल, लोटस ग्रुप, रिव्हर नेस्ट, पार्श्व रिॲलिटी, वृंदा लाईफस्पेसेस, सोनिगरा क्रॉप अशा प्रमुख प्रायोजकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी जेष्ठ अभिनेते मा. मकरंद अनासपुरे, महापौर रवी लांडगे यांनी आपले मनोगत व्यक्त केले, तर आभार प्रदर्शन मा. संतोष सौंदणकर यांनी केले. सूत्रसंचालन शुभांगी शिंदे यांनी केले.सोहळा प्रेरणादायी ठरला आणि समाजातील प्रेरक व्यक्तिमत्त्वांचा योग्य सन्मान करण्यात यश मिळाले.




> "उद्योग म्हणजे फक्त नफा नाही; ते समाजासाठी, लोकांसाठी आणि पुढील पिढीसाठी नवीन संधी निर्माण करण्याचे माध्यम आहे. दृढनिश्चय, प्रामाणिकपणा आणि मेहनत यांवर टिकून राहिल्यास यश आपोआप आपल्यासमोर येते."
>
> - भरत गीते, महाराष्ट्र उद्योग भूषण.

> "जगण्यासाठी फक्त स्वप्ने पाहणे पुरेसे नाही, ती स्वप्ने प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न, धैर्य आणि समाजाची सेवा आवश्यक आहे. प्रत्येक कृतीत समाजाला काही तरी देण्याचा विचार असावा, मग यश आपोआप पाठलाग करते."
>
> - मकरंद अनासपुरे, ज्येष्ठ अभिनेता.

# मोठ्या प्रकल्पांपेक्षा मूलभूत सुविधा सोडविण्यावर भर द्या

## खासदार श्रीरंग बारणे यांच्या महापालिका प्रशासनाला सूचना; महापालिकेत आढावा बैठक

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात किती विकास कामे केले, नवीन प्रकल्प राबविले यापेक्षा पाणी, स्वच्छता, आरोग्य, स्वच्छता या मुलभूत सुविधा किती सक्षमपणे दिल्या जातात हे महत्वाचे आहे. त्यामुळे मोठ्या प्रकल्पांपेक्षा मुलभूत सुविधा मुबलक प्रमाणात देण्यावर भर द्यावा. नागरिकांना पुरेसे, स्वच्छ पाणी मिळाले पाहिजे. रावेत, निघोजे बंधाऱ्यातून उचलण्यात येणारे पाणी अतिशय अशुद्ध आहे. त्यामुळे शिवणेतील बंधाऱ्यातून पाणी उचलण्यात यावे, असे निर्देश शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी महापालिका अधिकाऱ्यांना दिले.

शहरातील विविध प्रश्नांसंदर्भात खासदार बारणे यांनी सोमवारी महापालिका आयुक्त विजय सूर्यवंशी यांच्याबरोबर आढावा बैठक घेतली. अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, विक्रांत बगाडे, तृप्ती सांडभोर, मुख्य लेखा आधिकारी प्रविण जैन, उपायुक्त ममता शिंदे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, संजय कुलकर्णी, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्षण गोफणे, नगररचना उपसंचालक किशोर गोखले, सह आयुक्त मनोज लोणकर, सह शहर अभियंता बापू गायकवाड, सुनिल भागवानी, मनोज शेटीया, अनिल भालसाकळे, प्रेरणा सिनणकर, वायसीएमचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, उद्यान अधिकारी महेश गारगोटे, शिवसेना उपनेत्या सुलभा उबाळे, महापालिका गटनेते विश्वजीत बारणे, नगरसेवक निलेश तरस, नगरसेवक निलेश बारणे, नगरसेविका ऐश्वर्या तरस, बापू कातळे उपस्थित होते.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, महापालिकेकडून रावेत बंधाऱ्यातून उचलण्यात येणारे पाणी अतिशय अशुद्ध आहे. देहूरोड, किवळे भागातील नाले नदीला मिळत आहेत. काही सोसायट्यांमधील सांडपाणीही थेटपणे नदीपात्रात सोडले जाते. त्यामुळे अशुद्ध पाणी होत आहे. महापालिका पवना धरणातू ५५० एमएलडी पाणी उचलते. पाणी उचलणे, शुद्धीकरणाची क्षमता नसल्याने जास्त पाणी उचलणे वाढविण्यात येत नाही. रावेत येथील पाणी अशुद्ध झाल्याने शिवणे बंधाऱ्यातून पाणी उचलण्याबाबत चाचपणी करावी. महापालिकेने तिथे गेट उभारले आहे. त्यामुळे भविष्यात तेथून पाणी उचलावे. अन्यथा सांडपाणी मिश्रित पाणी नागरिकांना मिळेल. आंद्रा धरणातील शंभर एमएलडी पाणी निघोजे बंधाऱ्यातून उचलण्यात येते. हे पाणी रावेतपेक्षा अशुद्ध असल्याचे प्रशासनाने सांगितले. त्यामुळे शहराला अशुद्ध पाणीपुरवठा होत आहे. त्यासाठी उपाययोजना कराव्यात. टँकर बंद झाले पाहिजेत. पुरेशा दाबाने आणि स्वच्छ पाणीपुरवठा करावा. त्यामुळे थेट अशुद्ध पाणी नागरिकांना दिले जात आहे. त्यामुळे या पाणी पाईपलाईन बदलणे आवश्यक आहे.



### बांधकाम विकसकांकडून उद्याने विकसित करुन घ्या..

» उन्हाळ सुटीत महापालिका शाळांवरील पाणी टाक्या स्वच्छ कराव्यात. स्वच्छतागृहे, परिसर स्वच्छ करावा. मैदानावर ब्लॉक बसविल्याने मुलांचा मातीशी संपर्क कमी केला आहे. मातीशी संपर्क राहू द्यावा. शाळांमध्ये पाणी फिल्टर, जीम करायची असल्यास त्याची यादी द्यावी. सीएसआर फंडातून निधी उपलब्ध करुन दिली जाईल. शहरातील उद्यानाची दुरवस्था झाली आहे. एकही गार्डन व्यवस्थित नाही, लॉन नाही. ठेकेदार राजकीय लोकांशी संबंधित असतात. बांधकाम विकसक चौक विकसित करतात. त्याचप्रमाणे उद्याने विकसित करुन घ्यावीत. देखभाल दुरुस्तीची जबाबदारी त्यांच्यावरच ठेवावी. त्यासाठी विकसकांची तयारी आहे. उद्यानाला महापालिकेचे नाव ठेवावे. त्यासाठी बांधकाम विकसकांची बैठक घ्यावी. त्यांची कामे तत्काळ केली, तर तेही महापालिकेला मदत करतील, असेही ते म्हणाले.

### मोकाट श्वानांचा बंदोबस्त करावा..

» शहरात मोकाट श्वानांचा उपद्रव वाढला आहे. या क्षेत्रात काम करणाऱ्यांबरोबर घेऊन श्वानांसाठी संगोपण केंद्र करता येईल का याचा अभ्यास करावा. त्यासाठी उपाययोजना कराव्यात. मोकाट, पाळीव श्वानांना जीपीएस सिस्टीम बसवावी. कोणता श्वान कुठे जातो, कोणाला चावा घेतला आहे त्याची माहिती मिळेल. रेबीज इंजेक्शन द्यावेत, अशी सूचनाही त्यांनी केली.

### बांधकाम विभागातील टेबल कमी करा..

» बांधकाम विभागात प्रत्येक टेबलवर दोन टक्के घेतल्याशिवाय फाईल पुढे जात नाही. त्यामुळे टेबल कमी करावेत. बांधकाम परवानगीसाठी एक खिडकी योजना सुरु करावी. त्यामुळे भ्रष्टाचार होणार नाही. बांधकाम विकसक, नागरिकाला तत्काळ परवानगी मिळाली पाहिजे. जो भाग नव्याने विकसित झाला आहे. त्या भागात पाणी, वीज, स्वच्छता या सुविधा देण्याची सूचनाही खासदार बारणे यांनी केली.

### प्रभागातील अधिकाऱ्यांच्या बदल्या करा..

» प्रभाग स्वतरावरील अधिकाऱ्यांकडून सर्वसामान्य नागरिकांच्या कामांची दखल घेतली जात नाही. त्यासाठी वर्षानुवर्षे प्रभागात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची बदली करावी. लोकप्रतिनिधींबरोबर सर्वसामान्य नागरिकांच्या ऐकले पाहिजे. महापालिका रुग्णालयांमध्ये ३५ टक्के शहराबाहेरील रुग्ण उपचार घेतात. कोणावर उपचार करण्यास विरोध नाही. पण, शहरातील करदात्यालाही दर्जेदार उपचार मिळाले पाहिजेत. खासगी रुग्णालयांना धर्मादाय आयुक्तांच्या आदेशानुसार दहा टक्के बेड राखीव ठेवावे लागतात. महापालिका हद्दीत २० रुग्णालये आहेत. हे रुग्णालये शासकीय योजनांचा रुग्णांना फायदा देत नाहीत. त्याचे ऑडीट करण्याची महापालिकेची जबाबदारी आहे. महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत किती रुग्णांना लाभ दिला, किती जणांना मोफत उपचार दिले, याची माहिती घ्यावी. गरीब रुग्णांना उपचार दिले जातात का, याची तपासणी करावी. काही रुग्णालये वसुली केंद्र झाली आहेत. रुग्णांची लूट करतात. त्याची तपासणी करावी, असेही ते म्हणाले.

# शहर विद्रुपीकरण करणाऱ्यांसाठी आता "नो कॉम्प्रमाईज"

## महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचा इशारा : नोटीस अन् दंडात्मक कारवाई होणार!

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराचे सौंदर्य आणि शिस्तबद्धता जपणे ही प्रशासनासोबत नागरिकांचीही प्राथमिक जबाबदारी आहे. अनधिकृत जाहिरात फलक, बॅनर्स आणि भिंतींवरील जाहिरातींमुळे शहराचे विद्रुपीकरण होत असून अशा प्रकारांना कोणतीही सहनशीलता दाखवली जाणार नाही. तसेच सर्व क्षेत्रीय अधिकारी आणि बीट निरीक्षकांना संबंधितांवर कठोर कारवाई करून जाहिरातदारांना नोटिसा देऊन दंडात्मक कारवाई करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तरी नागरिक आणि जाहिरातदारांनी नियमांचे पालन करून महापालिकेला सहकार्य करावे, अन्यथा अनधिकृत फलक हटवून दंडात्मक आणि कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिला आहे.



पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत सार्वजनिक ठिकाणी अनधिकृतरित्या लावण्यात येणारे जाहिरात फलक, बॅनर्स, फ्लेक्स तसेच दूरध्वनी खांब, महावितरण डीपी आणि सार्वजनिक भिंतींवर करण्यात येणाऱ्या जाहिरातींमुळे शहराचे विद्रुपीकरण होत आहे. हे रोखण्यासाठी संबंधित क्षेत्रीय अधिकारी, विभागप्रमुख आणि बीट निरीक्षक यांच्या मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रात नियमित पाहणी करून अनधिकृत फलक, बॅनर्स, फ्लेक्स त्वरित हटवावेत. तसेच अशा जाहिरातींवर नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकांवर संपर्क साधून संबंधित जाहिरातदारांना नोटिसा बजवाव्यात, अशा सूचना आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिल्या आहेत.

# समान पाणीपुरवठा योजनेला गती; नागरिकांना दिलासा

## मुठा कालव्याच्या बांधातून जलवाहिनी; पीएमसीकडून 10.37 कोटी खर्चाला मंजुरी

**पुणे | प्रतिनिधी**

मुठा उजवा कालव्याच्या बांधामधून पिण्याच्या पाण्याची जलवाहिनी टाकण्यासाठी जलसंपदा विभाग जागा भाडेपट्ट्याने घेण्याच्या प्रस्तावाला पालिकेच्या स्थायी समितीने मान्यता दिली आहे. या बदल्यात पालिकेला १० कोटी ३७ लाखांच्या खर्चास स्थायी समितीने मान्यता दिली आहे. समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत १००० मिमी व ५०० मिमी व्यासाच्या जलवाहिन्या स्वारगेट ते जवाहरलाल नेहरू रस्त्यापर्यंत टाकण्याचे नियोजन आहे. यासाठी जलसंपदा विभागाच्या मालकीची जागा वापरणे आवश्यक असल्याने भाडेपट्टा देण्यास शासनस्तरावर मान्यता देण्यात आली आहे.




### कालव्यामधून जलवाहिनीचा निर्णय

» मुठा उजव्या कालव्याच्या बांधामधून जलवाहिनी टाकण्याच्या प्रस्तावाला पुणे महापालिकेच्या स्थायी समितीने मंजुरी दिली आहे. जलसंपदा विभागाची जागा भाडेपट्ट्याने घेण्यासाठी १०.३७ कोटी रुपयांचा खर्च मंजूर करण्यात आला. समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत स्वारगेट ते जवाहरलाल नेहरू रस्त्यापर्यंत १००० मिमी व ५०० मिमी व्यासाच्या जलवाहिन्या टाकण्याचे नियोजन आहे. रस्त्यालगत आधीच असलेल्या विविध सुविधा आणि तांत्रिक अडचणी लक्षात घेता कालव्याच्या बांधाचा पर्याय स्वीकारण्यात आला आहे, ज्यामुळे काम अधिक सुलभ होणार आहे.

### नागरिकांना मोठा दिलासा

» नवीन जलवाहिनीमुळे शहरातील शुक्रवार पेठ, गुरुवार पेठ, नाना पेठ, भवानी पेठ यांसह अनेक भागातील सुमारे सहा ते साडेसहा लाख नागरिकांना दररोज ८० एमएलडी पाणीपुरवठा होणार आहे. जुन्या जलवाहिन्यांमधून होणारी गळती आणि कमी दाबाची समस्या यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. नवीन पाइपलाइनमुळे या समस्या दूर होऊन नियमित व पुरेसा पाणीपुरवठा होईल. त्यामुळे पाण्याची टंचाई कमी होऊन नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

### तांत्रिक अडचणींवर मात

» पालिकेकडून सुरुवातीला जलवाहिनी रस्त्यालगत टाकण्याचा विचार होता. मात्र, पावसाळी जलवाहिन्या, ड्रेनेज लाईन, मेट्रो, उड्डाणपूल यांसारख्या पायाभूत सुविधांमुळे कामात अडथळे निर्माण होत होते. काही ठिकाणी नाला क्रॉसिंगमुळे काम अधिक गुंतागुंतीचे होण्याची शक्यता होती. त्यामुळे रस्ता खोदकाम टाळण्यासाठी कालव्याच्या बांधामधून जलवाहिनी टाकण्याचा निर्णय घेण्यात आला. या पर्यायामुळे वेळ आणि खर्च दोन्ही वाचणार असून कामाची गतीही वाढणार आहे.

पालिकेकडून ही जलवाहिनी कालव्याच्या शेजारून टाकण्यात येणार होती. मात्र, या मार्गावर आधीच पावसाळी जलवाहिन्या, ड्रेनेज लाईन, मेट्रो, उड्डाणपूल तसेच इतर पायाभूत सुविधा अस्तित्वात आहेत. त्यामुळे नव्याने जलवाहिनी टाकताना तांत्रिक अडचणी निर्माण होण्याची शक्यता होती. तसेच काही ठिकाणी नाला क्रॉसिंगच्या ठिकाणी काम अधिक गुंतागुंतीचे होण्याची शक्यता होती. त्यामुळे रस्ता खोदकाम टाळण्यासाठी कालव्याच्या बांधामधून जलवाहिनी टाकण्याचा पर्याय निवडला आहे.

पालिकेकडून पर्वती जलकेंद्र ते मित्रमंडळ चौकातून पुढे पंडीत नेहरू रस्त्या पर्यंत सुमारे अडीच किलोमीटरची नवीन १००० मिमी व ५०० मिमी व्यासाची जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. त्यासाठी पालिकेने वर्षभरापूर्वी जलसंपदा विभागाकडे कामाला मान्यता देण्याची मागणी केली होती. मात्र, जलसंपदा विभागाने पालिकेकडे जागेच्या भाड्यापोटी एकवट निधी म्हणून तब्बल १०.३७ कोटी रुपयांच्या शुल्काची मागणी केली होती.


कालव्यालगतचा रस्ता काँक्रिटीकरण करण्याचा हट्ट धरला होता. महापालिकेकडून केली जाणारी कामे नागरिकांसाठीची असल्याने तसेच पालिकेस जलवाहीनी टाकण्यासाठी इतर कोणताही शासकीय विभाग शुल्काची मागणी करत नसल्याने हे शुल्क देण्यास नकार दर्शविला होता. मात्र, पाण्याची वाढती टंचाई लक्षात घेत पालिकेने अखेर एक पाऊल मागे घेतले आहे.

# हडपसर-खडकी रेल्वेस्थानकांच्या विकासाला गती

## गर्दीनिवारणासाठी 96 कोटींचा निधी मंजूर; प्रवाशांना मिळणार आधुनिक सुविधा

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरातील रेल्वेप्रवाशांची वाढती संख्या आणि स्थानकावरील ताण लक्षात घेता रेल्वे प्रशासनाने पुणे गर्दीनिवारण योजनेला मोठी गती दिली आहे. या योजनेंतर्गत हडपसर आणि खडकी या दोन महत्त्वाच्या उपनगरीय स्थानकांच्या विकासासाठी अतिरिक्त निधीला मंजुरी दिली आहे. विशेषतः हडपसर रेल्वेस्थानकावर चौथा प्लॅटफॉर्म आणि नवीन पादचारी पुलासाठी 26 कोटी रुपये, तर खडकी टर्मिनलच्या स्थानक इमारत आणि प्रवासी सुविधांसाठी 70 कोटींच्या अतिरिक्त कामांना मंजुरी मिळाली आहे



> पुणे रेल्वेस्थानकावरील प्रवाशांची गर्दी विभागण्यासाठी हडपसर आणि खडकी टर्मिनलचा विकास करणे, ही काळाची गरज आहे. आम्हाला प्राप्त झालेला अतिरिक्त 96 कोटींचा निधी प्रवाशांना जागतिक दर्जाच्या सुविधा देण्यासाठी आणि रेल्वेचे परिचालन अधिक सुरळीत करण्यासाठी वापरला जाईल. नवीन प्लॅटफॉर्म, पादचारी पूल आणि आधुनिक इमारतींमुळे प्रवाशांचा वेळ वाचेल आणि त्यांचा प्रवासाचा अनुभव अधिक सुखद होईल.
>
> - राजेशकुमार वर्मा, विभागीय रेल्वे व्यवस्थापक, पुणे विभाग, मध्य रेल्वे.

हडपसर स्थानकाचा विस्तार 153 कोटी रुपये खर्चून आधीच केला जात आहे. यामध्ये यार्डची क्षमता 7 मार्गिकांपर्यंत वाढविणे आणि फलाटाची लांबी वाढविणे, यांसारखी महत्त्वपूर्ण कामे प्रगतिपथावर आहेत. आता मंजूर झालेल्या अतिरिक्त 26 कोटींमुळे तिथे चौथ्या फलाटाची (प्लॅटफॉर्म) निर्मिती केली जाणार आहे. यामुळे हडपसर येथून अधिक गाड्या सोडणे शक्य होणार आहे. तसेच, सर्व फलाटांना जोडणारा दुसरा प्रवेशद्वार विकसित केल्यामुळे प्रवाशांना स्थानकात येणे आणि बाहेर जाणे अधिक सोयीचे होणार आहे, असे रेल्वेच्या पुणे विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक राजेशकुमार वर्मा यांनी सांगितले.

खडकी रेल्वेस्थानकाचेही मोठ्या प्रमाणावर आधुनिकीकरण केले जात आहे. 50 कोटी रुपये खर्चून यार्डचा विस्तार 8 मार्गिकांपर्यंत करण्यात आला असून, फलाटांची (प्लॅटफॉर्म) संख्या 3 वरून 4 केली आहे. आता अतिरिक्त 70 कोटींच्या निधीतून स्थानकाची नवीन भव्य इमारत, अत्याधुनिक पादचारी पूल आणि प्रवाशांसाठी प्रतीक्षालय व इतर सुविधांचे जाळे उभारले जाणार आहे. या विकासकामामुळे खडकी रेल्वे टर्मिनल हे पुण्यातील एक प्रमुख रेल्वे हब म्हणून भविष्यात उदयास येणार आहे. पुणे शहरातील रेल्वेप्रवाशांची वाढती संख्या आणि स्थानकावरील ताण लक्षात घेता रेल्वे प्रशासनाने पुणे गर्दीनिवारण योजनेला मोठी गती दिली आहे. या योजनेंतर्गत हडपसर आणि खडकी या दोन महत्त्वाच्या उपनगरीय स्थानकांच्या विकासासाठी अतिरिक्त निधीला मंजुरी दिली आहे.

# सरकारीसह खासगी रुग्णालयांत उपचार मोफतच!

## आरोग्यमंत्र्यांचे 'जनआरोग्य' योजनांबाबत निर्देश; पात्र रुग्णांना नाकारल्यास कठोर कारवाईचा इशारा

**पुणे | प्रतिनिधी**

प्रधानमंत्री जनआरोग्य योजना (पीएमजेएवाय) आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना (एमजेपीजेएवाय) यांची अंमलबजावणी सरकारी रुग्णालयांनी प्रभावीपणे करून प्रत्येक पात्र रुग्णांवर त्यांअंतर्गत उपचार करावेत, असे निर्देश आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. खासगी रुग्णालयांच्या विरोधात या योजनांसंबंधी तक्रारी आल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

प्रधानमंत्री जनआरोग्य योजना (पीएमजेएवाय) आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना (एमजेपीजेएवाय) यांचा अंमलबजावणी विभागीय आढावा आरोग्यमंत्री आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली नुकताच घेण्यात आला. या बैठकीस आरोग्य उपसंचालक डॉ. भगवान पवार, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागनाथ येमपल्ले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रामचंद्र हनकारे, योजनेचे क्षेत्रीय व्यवस्थापक डॉ. वैभव गायकवाड तसेच पुणे जिल्हा समन्वयक डॉ. प्रीती लोखंडे आदी उपस्थित होते.



### खासगी रुग्णालयांवर कारवाईचा इशारा

» जनआरोग्य योजनांबाबत तक्रारी आल्यास खासगी रुग्णालयांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा आरोग्यमंत्र्यांनी दिला. पात्र रुग्णांना उपचार नाकारणे किंवा अतिरिक्त शुल्क आकारणे सहन केले जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच जिल्हानिहाय अधिकाधिक रुग्णालये या योजनांमध्ये समाविष्ट करण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश देण्यात आले. शासकीय तसेच अंगिकृत रुग्णालयांनी योजनेंतर्गत सर्व सुविधा पारदर्शकपणे उपलब्ध करून द्याव्यात, यावर भर देण्यात आला. या उपाययोजनांमुळे आरोग्य सेवांमध्ये विश्वासार्हता वाढण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

या बैठकीत जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होत आहे का, याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. सर्व शासकीय रुग्णालयांनी अंगिकृत होऊन प्रत्येक पात्र रुग्णावर उपचार योजनेंतर्गतच करावेत, अशा सूचना आरोग्यमंत्र्यांनी दिल्या. प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी योजनेंतर्गत २५ उपचार प्रक्रियांची तरतूद असून, त्या प्रक्रियांमध्ये बसणाऱ्या रुग्णांचे पूर्व-अधिकृतीकरण योजनेच्या संकेस्थळावरून पाठविल्यास संबंधित केंद्राला दाव्याची मंजुरी लवकर मिळणार आहे.

त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रांना निधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. योजनेतील २२३ शासकीय मंजूर प्रक्रियांतर्गत उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयांनी पात्र रुग्णांचे पूर्व-अधिकृतीकरण करणे अनिवार्य आहे, असे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. या योजनांमधील अंगिकृत खासगी रुग्णालयांविषयी तक्रारी आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल.

तसेच प्रत्येक जिल्ह्यात किमान शंभर किंवा त्याहून अधिक रुग्णशय्या क्षमतेची रुग्णालये अंगिकृत करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश आरोग्यमंत्र्यांनी दिले. दरम्यान, पुणे विभागातील सर्व शासकीय रुग्णालये या योजनांची अंमलबजावणी अधिक गतिमान करतील, असा विश्वास आरोग्य संचालक डॉ. भगवान पवार यांनी व्यक्त केला.

### मोफत उपचारांची हमी

» प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत पात्र रुग्णांना सरकारी तसेच खासगी रुग्णालयांत मोफत उपचार देणे बंधनकारक असल्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी स्पष्ट केले. या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे व्हावी यासाठी सर्व शासकीय रुग्णालयांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे निर्देश देण्यात आले. उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांचे पूर्व-अधिकृतीकरण वेळेत करणे आवश्यक असून त्यामुळे रुग्णालयांना निधी लवकर उपलब्ध होईल. यामुळे गरीब व गरजू रुग्णांना आर्थिक दिलासा मिळून त्यांना दर्जेदार आरोग्यसेवा सहज मिळणार आहे.

> “ पुणे विभागातील सर्व उपजिल्हा, ग्रामीण रुग्णालये तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांनी पुढील एका महिन्यात योजनेंतर्गत रुग्णांवर उपचार सुरू करावेत. त्याचा आढावा महिन्यानंतर घेण्यात येईल. योजनेंतर्गत उपचार न करणाऱ्या रुग्णालयांच्या समन्वय अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई होईल.
>
> \- प्रकाश आबिटकर, आरोग्यमंत्री

# बारामती निवडणुकीत मोठा ट्विस्ट; लक्ष्मण हाके यांचा सुनेत्रा पवारांना पाठिंबा

## कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या शिष्टाईला यश; ओबीसी नेत्यांनी घेतली माघार

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती: बारामती विधानसभेची पोटनिवडणूक जाहिर झाल्यापासून ही निवडणूक कोणत्याही परिस्थितीत बिनविरोध होऊ देणार नाही, अशी गर्जना करणारे ओबीसी आंदोलन लक्ष्मण हाके यांनी अखेर आपली तलवार म्यान केली. सोमवारी (दि. ६) सकाळी बारामतीत वेगवान घडामोडी घडल्या. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी हाके यांच्याशी चर्चा केली. त्यांची ही शिष्टाई फळाला आल्याचे स्पष्ट झाले

बारामतीत संपतराव टाकले यांच्या निवासस्थानी नामदार भरणे व हाके यांच्या चर्चा झाली.



यावेळी पवार यांचे निकटवर्तीय किरण गुजर हे देखील बैठकीला उपस्थित होते. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामतीचा केलेला सर्वांगीण विकास, राज्याच्या विकासात त्यांचे असणारे योगदान लक्षात घेऊन हाके यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना पाठिंबा द्यावा, अशी विनंती भरणे यांनी केली.

बंद दाराआड त्यांची काही वेळ चर्चा झाली. हाके यांनी ती मान्य करत संयुक्त पत्रकार परिषद घेत पवार यांना पाठिंबा देत असल्याचे जाहीर केले. दरम्यान गेल्या महिनाभरापासून हाके यांनी बारामतीची निवडणूक कोणत्याही परिस्थितीत लढवणार असे सांगत रान उठवले होते. त्यामुळे ही निवडणूक बिनविरोध होणार नाही हे जवळपास निश्चित झाले होते. परंतु सोमवारी सकाळी घडलेल्या वेगवान घडामोडीनंतर हाके यांनी माघार घेतली. हाके यांनी केलेल्या सहकार्याबद्दल भरणे यांनी त्यांचे आभार व्यक्त केले.

### सुनेत्रा पवार यांना जाहीर पाठिंबा

» गेल्या महिनाभरापासून लक्ष्मण हाके यांनी बारामतीची निवडणूक लढवण्याचा इरादा व्यक्त करत वातावरण तापवले होते. त्यामुळे ही निवडणूक बिनविरोध होणार नाही, असे चित्र निर्माण झाले होते. मात्र, अचानक झालेल्या चर्चेनंतर त्यांनी माघार घेतल्याने राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त होत आहे. सुनेत्रा पवार यांना दिलेल्या पाठिंब्यामुळे निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता वाढली आहे. हाके यांच्या या निर्णयाबद्दल दत्तात्रय भरणे यांनी आभार मानले असून, बारामतीच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.